 भुसंपादन अर्ज क्र.१८/२०२३
नि.क्र. २० खाली

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र. २ तर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. एस. डी. बारबोले यांचेमार्फत शपथेवर सुरू :–**

हे म्हणणे खरे नाही की, जमीन संपादित होत असताना मला नोटीस मिळाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, निवाडा होत असताना मी तेथे हजर होतो. निवाडयाचे अनुषंगाने मला थोडे पैसे मिळाले होते. किती पैसे मिळाले माझे लक्षात नाही. माझी सहा सात गुंठे जमीन गेली. हे म्हणणे खरे नाही की, मला जे काही पैसे मिळाले ते सन २००७ च्या बाजारभावाप्रमाणे बरोबर होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी जमीन कोरडवाहू होती. जमिनीला वाढीव भाव मिळण्यासाठी मी अर्ज केला. आता वीस लाख रुपये भाव जमिनीला चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, वीस लाख रुपये भाव असलेबाबतचे कागदपत्रे माझेकडे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ३७३/५ मध्ये माझी अजून जमीन शिल्लक आहे. मी दाखल केलेले खरेदीखत किती रुपयाचे आहे माहित नाही. माझी संपादित जमीन वाशीमध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेले खरेदीखत माझे संपादित जमिनीला लागू होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा अर्ज मुदतीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

प्रतिवादी क्र.२ तर्फे उलटतपास पुर्ण.
प्रतिवादी क्र.१ व ३ च्या विधिज्ञांनी प्रतिवादी क्र.२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्विकारला.
उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.
दिनांक – ०९/०७/२०२६ श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

**(श्रीमती पी.एस.जाधव)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, भूम.